मुख्य अग्निशमन अधिकारी यांचे कार्यालय
पुणे महानगरपालिका, पुणे
जावक क्र. अशाद/ ५०५८
दिनांक :- 3/3/2020

**नियुक्ती आदेश**

विषय :- अग्निशमन दलाकडील फायरमन पदावर कार्यरत सेवकांना अग्निशमन व बचाव कार्यामध्ये मदतीसाठी **"मदतनीस"** या अस्थायी पदावर तीन महिने मुदतीसाठी दैनिक मानधन तत्वावर करार पद्धतीने सेवा घेणेबाबत,

संदर्भ :- मा. महापालिका आयुक्त, ठ. क्र. ६/८८६, दिनांक २८/०१/२०२०,

अग्निशमन दलाकडे करार पद्धतीने "मदतनीस" या अस्थायी पदाच्या सेवा घेण्याकरिता संदर्भांकित ठरवान्वये मिळालेल्या मान्यतेनुसार "मदतनीस" या अस्थायी पदावर प्रतीक्षा यादीमधील खालील उमेदवारांची या आदेशामधील नमूद अटी व शर्तीनुसार नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून दि. ०३/०६/२०२० अखेर मुदतीसाठी करार पद्धतीने सेवा घेण्यात येत आहे.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | गट | मोबाईल क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | श्री. भोसले दिपक भालचंद्र | खुला | ९७३००३८२६४ |
| २ | श्री. गायकवाड विशाल संजय | खुला | ९८२२७९३४५९ |
| ३ | श्री. भट तेजस संजय | खुला | ९९२३१३१६३३ |
| ४ | श्री. कांबळे हेमंत प्रकाश | खुला | ८६०५०११३९० |
| ५ | श्री. शिंदे अक्षय सतीश | खुला | ७०८३८६३९३६ |
| ६ | श्री. शिंदे हेमंत अमर | खुला | ९८८१०२०४६८ |
| ७ | श्री. घुंडरे अमित केशव | खुला | ९१३०००३१०१ |
| ८ | श्री. नखाते अक्षय महादेव | खुला | ७७४१०४२८२३ |

**अटी व शर्ती**

१. वरील सर्व उमेदवारांना नेमणूकीच्या कालावधीत किमान वेतन दरानुसार दैनिक भत्ता रुपये ६८३.०८ नुसार हजेरीच्या प्रमाणात वेतन दिले जाईल.
२. वरील उमेदवारांनी सेवेत रुजू होणेपुर्वी दैनिक दरानुसार एक महिन्याची रक्कम सेवा अनामत रक्कम म्हणून मनपा कोष कार्यालयात जमा करावयाची आहे.
३. वरील उमेदवारांना देण्यात येणारे वेतन हे शासकीय व सक्तीचे वजावटीस पात्र राहील.
४. वरील उमेदवार नियुक्ती आदेशाचे दिनांकापासून एक आठवड्याच्या आत रुजू न झाल्यास त्यांची निवड आपोआप रद्द होईल. याबाबत उमेदवाराबरोबर कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही तसेच मुदतवाढ मंजूर केली जाणार नाही.
५. सदर पदे भरण्याकरिता प्रसिद्ध झालेल्या जाहिरातीमधील सर्व अटी व नियुक्ती आदेशामधील अटी तसेच उमेदवाराकडून घ्यावयाच्या करारनाम्यामधील अटी व शर्ती सदर सेवेच्या कालावधीत उमेदवारावर बंधनकारक राहतील.
६. वरील उमेदवारांनी कामावर रुजू झाल्यावर एक आठवड्याच्या आत स्वखर्चाने करारनामा करून द्यावयाचा आहे.
७. वरील उमेदवारांच्या सेवा या करारपद्धतीने दिनांक ०३/०६/२०२० अखेर घेण्यात येत असून या आदेशाचे करारातील सेवेचा आधार घेऊन भविष्यात पुणे मनपाच्या आस्थापनेवरील कोणत्याही पदावर हंगामी अथवा कायमस्वरूपी नेमणुकीसाठी हक्क सांगता येणार नाही. तसेच पुणे मनपाच्या कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेले कोणतेही लाभ, हक्क मिळण्यास ते पात्र ठरणार नाहीत.
८. वरील पदासाठीची नेमणूक ही दैनिक भत्ता दरानुसार आज्ञापत्रकाच्या दिनांकापासून ०३/०६/२०२० अखेर मुदतीकरिता तात्पुरत्या कालावधीकरिता असेल. त्यानंतर ही नेमणूक आपोआप संपुष्टात येईल.

Scanned by CamScanner

९. वरील सर्व उमेदवारांच्या नियुक्ती बाबतचे तसेच नियुक्तीनंतर ०३ महिन्याच्या कालावधीमध्ये केव्हाही सदरील नेमणुका रद्द करण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी राखून ठेवलेले आहेत.

१०. सदरील नेमणूक कालावधीत उमेदवारास अग्निशमन व बचाव कार्यामध्ये प्रत्यक्ष काम करताना कोणत्याही स्वरुपाची दुखापत झाल्यास/ शारीरिक विकलांगता आल्यास/ कोणताही अवयव निकामी झाल्यास सुरक्षाकवच म्हणून सदर सेवकांचा अपघाती विमा उतरविण्यात येणार असून त्याना भरपाई देण्याची संपूर्ण जबाबदारी विमा कंपनीची असेल त्याची कोणतीही जबाबदारी पुणे मनपावर राहणार नाही. तसेच अन्य कोणत्याही स्वरुपाची नुकसान भरपाईची मागणी करता येणार नाही.

११. नेमणूक झालेल्या उमेदवारांना पुणे मनपाच्या अग्निशमन दलाकडील कार्यरत असणाऱ्या कोणत्याही अग्निशमन केंद्राकडे अग्निशमन दलाकडील पाळी पद्धतीनुसार नेमणूक देण्यात येईल.

(प्रशांत द. रणपिसे)
मुख्य अग्निशमन अधिकारी
पुणे महानगरपालिका

Scanned by CamScanner